नि.दि.दा. क्र.०४/२०१७
नामदेव – वि.– आतिश
**नि.क्र.१२५**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.५**

नावः उल्हास श्रीनीवास आठले,

वयः ६५ वर्ष, धंदाः हस्ताक्षर तज्ञ,

पत्ताः रामदासपेठ, नागपूर

**प्रतिवादीतर्फे सा.क्र.५ याचा सरतपास श्री. ए.जे.मुलमुले वकील साहेब यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** मी नागपूर विद्यापीठाचा विधी पद्वीधर आहे. मी वादग्रस्त दस्ताएवज तपासणी हस्ताक्षर व बोटांच्या ठस्यांची ओळख आणि तत्संबंधी विषयांचे प्रशिक्षण हस्ताक्षर तज्ञ स्वर्गवासी श्री. सी.टी. भणगे यांच्याकडून घेतले होते. मी सुमारे ४० वर्षांपासून खाजगी हस्ताक्षर तज्ञ म्हणून व्यवसाय करीत आहे. मी आतापर्यंत वेगवेगळ्या राज्यांमध्ये न्यायालयीन प्रकरणात व ईतर प्रकरणात हजारो वादग्रस्त दस्ताऐवज तपासून आपले तज्ञ या नात्याने अहवाल दिले असून अनेक प्रकरणात तज्ञ म्हणून साक्ष सुध्दा दिली आहे.

**२.** या प्रकरणामध्ये मला न्यायालयाकडून वादग्रस्त आणि तुलनात्मक सह्यांचे दस्त माझ्या तपासणी करीता प्राप्त झाले होते.

**३.** त्या अनुषंगाने मी नामदेव निस्ताने यांच्या **नि.क्र.९१** वरील वादग्रस्त सहीची तपासणी केली आणि त्या सहीला **डी–१** असे चिन्हीत केले. त्याचप्रमाणे नामदेव निस्ताने यांच्या खालील दस्तांवरील तुलनात्मक सह्यांची तपासणी केली.

**१.** **वादपत्र** – नि.क्र.१ – यावरील सह्यांना एस–१ ते एस–४ असे चिन्हीत केले.

२. **वकालतनामा** – नि.क्र.२ – यावरील सहीला एस–५ असे चिन्हीत केले.

३. **रजिस्टर्ड पत्ता** – नि.क्र.३ – यावरील सहीला एस–६ असे चिन्हीत केले.

४. दिनांक ३०/०६/२०२२ च्या नि.क्र.९२ वरील नमूना सह्यांना एस–७ ते एस–११ असे चिन्हीत केले.

४. मी वादग्रस्त आणि तुलनात्मक सह्यांचे डिजीटल पध्दतीने छायाचित्र काढले आणि त्यांचे एकूण चार छायाचित्रे प्राप्त केली. ती छायाचित्रे मी माझा दिनांक २०/०३/२०२३ रोजीच्या अहवालाला संलग्न केली आहे ते त्या अहवालाचा भाग आहे. मी वादग्रस्त आणि तुलनात्मक सह्यांची तपासणी करुन माझा दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल, चार छायाचित्रे आणि भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब अन्वये प्रमाणपत्र न्यायालयात सादर केले होते.

५. आता मला अभिलेखावर दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा प्रमाणपत्र अहवाल दाखविण्यात आला. हा मी दिलेलाच अहवाल असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२६** देण्यात येते. आता मी दिलेले दिनांक २०/०३/२०२३ रोजीचे भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब अन्वये प्रमाणपत्र दाखविण्यात आले. हे मी दिलेले प्रमाणपत्र असून त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२७** देण्यात येते. आता मला मी अहवालासोबत जोडलेले वादग्रस्त आणि तुलनात्मक सह्यांची एकूण चार छायाचित्रे दाखविण्यात आली. ती तेच छायाचित्रे आहेत जे मी काढले आहे. त्यास **नि.क्र.१२८ ते १३१** देण्यात येते.

६. माझ्या अहवालानुसार वादग्रस्त सही **डी–१** ही त्याच व्यक्तीने केलेली आहे ज्या व्यक्तीने तुलनात्मक सह्या **एस–१ ते एस–११** केलेल्या आहेत. या बद्दलची सविस्तर कारणे माझा अहवाल नि.क्र.१२६ मध्ये विस्तृतपणे दिलेली असून ती बरोबर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>वादीतर्फे श्री.एम.डी.पालीवाल वकील साहेब यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरुः</u>**

७. ए.आय. टेक्नोलॉजी बद्दल मी अवगत नाही. संगणकाच्या संबंधीत संपूर्ण तंत्रज्ञानाबाबत मी अवगत नाही, मला जुजबी ज्ञान आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या अहवालामध्ये चुकीची संभावना असू शकते. मी आजच्या काळात आलेल्या फोटोग्राफी, संगणक या क्षेत्रातील टेक्नोजॉली बाबत कोणताही अभ्यासक्रम केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क्र.१२७** कोणासमक्ष तयार करण्यात आले त्याबाबत त्यामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क्र.१२६ व १२७** हे कोणत्याही निष्पक्ष ईसमासमक्ष तयार केले नसून ते मी स्वतःच तयार केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१२७ मधील नमूद केलेला कॅमेरा, सी.डी. व संगणक तसेच सॉफ्टवेअर हे तांत्रीक दृष्ट्या योग्य स्थितीमध्ये होते याबाबत तांत्रीकदृष्ट्या सक्षम व्यक्तीचे प्रमाणपत्र जोडले नाही. मी माझ्या संगणकामध्ये एंटी वायरस टाकलेले आहे. मी माझे संगणक स्वतः हाताळतो. संगणक हाताळतांना प्रति मिनीटाला जवळपास ५०० सायबर अटॅक होतो किंवा काय याची मला माहीती नाही. जर संगणकामध्ये काही बिघाड झाला असेल किंवा कुठला वायरस आला असेल तर त्यामधून प्राप्त होणारे परिणाम व मुळ परिणाम यामध्ये तफावत होवू शकते किंवा काय हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, **नि.क्र.१२७** चुकिचे आहे व ते मला देण्याचा अधिकारी नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१२७ प्रमाणपत्र देतेवेळेस मला हस्ताक्षर परिक्षणाबाबत लागणाऱ्या इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांबाबत पूरेपूर ज्ञान नव्हते.

८. मी एंड्रॉईड फोन वापरतो. हे मला माहीत नाही की, I–Scanner, Sign A.I., Fillouts A.I. Signature Generator, Canva and PDF Filler या सॉफ्टवेअर मध्ये सहीस कॉपी करणारे टूल्स उपलब्ध आहेत किंवा काय. हे मला माहीत नाही की, I–Scanner मध्ये एखादी सही कॉपी करुन त्याची डिजीटल रेप्लीका तयार करण्याची टूल आहे किंवा काय. हे मला माहीत नाही की, Sign A.I.,मध्ये केलेल्या एखादी सहीच्या अक्षरांची डिजीटल रेप्लीका करुन त्या व्यक्तीच्या हस्ताक्षरातील लिखान तयार करुन

शकतो. हे म्हणणे खरे आहे की, मी साक्ष दिलेल्या प्रकरणामध्ये काही प्रकरणात एखाद्या व्यक्तीची खोटी सही केल्याबाबतचे सुध्दा प्रकरण होते. हस्ताक्षर तज्ञ म्हणून हा माझा वैयक्तीक व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वर्गवासी श्री. सी.टी. भणगे यांच्याकडून हस्ताक्षर तज्ञ म्हणून प्रशिक्षण घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी हस्ताक्षर तज्ञ आहे, या बाबतचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की, व्यक्तीच्या सहीमध्ये वेग वेगळ्या वेळेस स्वाभाविक बदल येवू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, कागदावरील मुळ सहीचा फोटो घेवून त्याला एन्लार्ज केल्यानंतर त्यामध्ये बदल येवू शकतो.

**९.** हे म्हणणे खरे आहे की, आजपर्यंत न्यायालयात सादर केलेल्या अहवालांपैकी काही अहवाल नाकारण्यात आले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी हस्ताक्षर परिक्षणाकरीता काही आधुनिक तंत्रज्ञान विकसीत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मी प्रशिक्षण घेतलेले नाही. परिक्षणाकरीता मला सदर प्रकरणातील दस्त कोर्टाच्या बेलिफद्वारे प्राप्त झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी न्यायालयात हजर राहण्याबाबत समन्स प्राप्त झाला नाही. आज रोजी हजर राहण्याबाबत मला प्रतिवादीच्या वकिलांनी माहीती दिली. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणातील अहवाल मी प्रतिवादींच्या सांगण्यावरुन तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा अहवाल न्यायालयात दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणात हस्ताक्षराचे परिक्षण करतांना आवश्यक योग्य प्रक्रियेचे पालन केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला अहवाल हा निश्पक्ष नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींच्या सांगण्यावरुन आज रोजी न्यायालयाज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.04.08 16:40:46 +0530

(जी.ओ. वानखडे)
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.04.08 16:40:51 +0530

(जी.ओ. वानखडे)
दि.न्या. क. स्तर, पारशिवनी

दिनांकः ०८/०४/२०२५